|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

Grade –B (2.88)
(NAAC RE- ACCREDITED)

P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

जा.क्र.उमवि/५/७१९/२०१२ दिनांक: ०१/११/२०१२

## शुध्दीपत्रक

प्रति,

१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.........

२) उमवि अधिक्षेत्रात नवीन महाविद्यालय/नवीन परिसंस्था सुरु करणेसाठी प्रस्ताव सादर केलेल्या/करणा-या/शासनाने नवीन महाविद्यालय/नवीन परिसंस्था सुरु करणेस मान्यता प्रदान केलेल्या संस्थांचे मा.अध्यक्ष/सचिव.

विषय:- विद्यापीठाच्या संलग्नता विभागातर्फे नियुक्त करण्यांत येणा-या विविध समित्यांच्या प्रवास व दैनिक भत्त्याबाबत........

संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/५/५७२/२०१२, दिनांक ०८/०८/२०१२

महोदय,

वरील विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, दिनांक ०१.०८.२०१२ पासून संलग्नता विभागामार्फत नियुक्त करण्यांत आलेल्या/येणा-या विविध समित्यांमधील सदस्यांना, ज्या महाविद्यालयांच्या/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या तपासणीकामी/चौकशी करणेकामी समिती नियुक्त करण्यांत आलेली आहे/येईल, अशा संबंधित महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी विद्यापीठाच्या प्रवास व दैनिक भत्ता नियमावलीनुसार समित्यांमधील सदस्यांना प्रवास व दैनिक भत्ता अदा करावा असे संदर्भिय परिपत्रकान्वये आपणांस कळविण्यांत आले होते.

उपरोक्त बाब मा.व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव तथा सहमतीस्तव सादर करण्यांत आली असता, मा.व्यवस्थापन परिषदेने ठराव क्रमांक व्य.प.सी-२४७/२०१२, दिनांक २५.०९.२०१२ पारीत केलेला आहे. मा.व्यवस्थापन परिषदेच्या सदर ठरावानुसार संदर्भिय परिपत्रकात दुरुस्ती तयार करण्यांत येत असून, संलग्नता विभागामार्फत यापुढे नियुक्त करण्यांत येणा-या विविध समित्यांवरील सदस्यांची, ज्या महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची तपासणी करणेकामी/चौकशी करणेकामी नियुक्ती करण्यांत आलेली आहे, अशा संबंधित नवीन महाविद्यालय/परिसंस्था यांचेसाठी तसेच संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या विस्तारासंदर्भात (New Course/subject, New Faculty, New additional division, Increase in Intake/Second Shift etc.) नियुक्त केलेल्या समिती सदस्यांना त्या-त्या संबंधित संस्था/संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी प्रवास/दैनिक भत्ता अदा करावा.

तरी कृपया वरीलबाबत नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यांत यावी, ही विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

**Sd/xxx**

(प्रा.डॉ.दि.गो.हुंडीवाले)
संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहितीसाठी:-

१) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग.

२) विद्यापीठाच्या प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख.